**आदेश**

जा.क्र. ४०२०/कोरोना/मनाई/ आदेश/२०२०
पोलीस आयुक्त कार्यालय, पुणे शहर
दिनांक - ०८/०४/२०२०

**विषय :- साथरोग अधिनियम १८९७ मधील तरतुद व महाराष्ट्र पोलीस अधिनियम १९५१ चे कलम ६८ च्या आदेशान्वये सर्व संबंधित नागरिकांनी मास्कचा वापर अनिवार्य करणेबाबत.**

ज्याअर्थी, जागतिक आरोग्य संघटनेने कोरोना विषाणुमुळे पसरत असलेला आजार हा साथीचा संसर्गजन्य आजार म्हणुन घोषित केला आहे. तसेच कोरोना विषाणुचा प्रसार भारतात, महाराष्ट्रात, पुणे शहरात गतीने पसरत आहे असे दिसुन येत आहे. तसेच राज्यशासनाने कोरोना विषाणु (कोविड-१९) चा प्रादुर्भाव रोखण्यासाठी राज्यात साथीचा रोग प्रतिबंधात्मक कायदा १८९७ दि.१३/०३/२०२० पासुन लागु करुन खंड २, ३ व ४ मधील तरतुदींनुसार अधिसुचना निर्गमित केलेली आहे. त्याबाबतची नियमावली तयार करण्यात आलेली आहे. सार्वजनिक आरोग्य विभाग, मंत्रालय, मुंबई यांचेकडील क्र.कोरोना २०२०/प्र.क्र.५८/आरोग्य ५/ दि.०७/०४/२०२० रोजीच्या अधिनिसुचेनुसार पोलीस आयुक्त यांना त्यांचे कार्यक्षेत्रात कोविड-१९ वर नियंत्रण आणणेसाठी व त्याचा प्रादुर्भाव रोखणेसाठी ज्या उपाययोजना करणे आवश्यक आहे, त्या करणेसाठी सक्षम अधिकारी म्हणुन घोषित करण्यात आले आहे.

ज्याअर्थी, पुणे पोलीस आयुक्तालयाचे हद्दीमध्ये अनेक ठिकाणी लोकसंखेची घनता अतिशय दाट असल्याने कोरोना विषाणुचा संसर्ग व प्रसार होण्यासाठी पोषक स्थिती उपलब्ध आहे. सदयस्थितीत पुणे शहरात कोरोना विषाणुच्या संसर्गाची लक्षणे आढळुन येत असलेल्या व्यक्ती मोठया संख्येने उपचारासाठी शासकीय व खाजगी दवाखान्यात दाखल होत आहेत. त्याचेवेळेला वैदयकीय तपासणीअंती कोरोना विषाणुचा संसर्ग झालेल्या रुग्णांची संख्या वेगाने वाढत आहे. जागतिक आरोग्य संघटनेच्या निर्देशानुसार कोरोना विषाणुच्या प्रसाराच्या या टप्प्यात कोरोना विषाणुचा संसर्ग कित्येक पटीने वाढुन पुणे शहरातील लोकसंख्या बाधित होवु शकते. कोरोना विषाणुच्या या वाढत्या प्रसाराला प्रतिबंध करण्यासाठी वैदयकीस तज्ञांच्या मार्गदर्शनानुसार मास्क, हॅण्डग्लोज, सॅनिटायझरचा वापर व सुरक्षित सामाजिक अंतर ठेवणे अत्यावश्यक आहे. कोरोना विषाणूचा संसर्ग व प्रसार प्रतिबंधित करण्यासाठी पोलीस आयुक्त कार्यालय, पुणे शहर यांचेकडील जा.क्र.२१०५/ कोरोना/मनाई/आदेश/२०२०, दि.२७/०३/२०२० अन्वये **वाहनांच्या वापरास मनाई** आदेश, जा.क्र.२२५०/कोरोना/मनाई/आदेश/२०२०, दि.३१/०३/२०२० अन्वये **जमावबंदी** आदेश तसेच जा.क्र.३०८८/कोरोना/मनाई/आदेश/२०२०, दि.०७/०४/२०२० अन्वये **संचारास मनाई आदेश** पुणे शहर पोलीस आयुक्तालयाच्या कार्यक्षेत्रात लागू करण्यात आलेले आहेत.

त्याअर्थी मी, डॉ. रवींद्र शिसवे, पोलीस सह आयुक्त, पुणे शहर महाराष्ट्र पोलीस अधिनियम १९५१ चे कलम ६८ व सार्वजनिक आरोग्य विभाग, मंत्रालय, मुंबई यांचेकडील उपरोक्त अधिनिसुचेनुसार नेमलेले सक्षम अधिकारी म्हणजेच पोलीस आयुक्त, पुणे शहर यांनी सुचित केलेप्रमाणे असा निर्देश देतो की, उपरोक्त नमुद मनाई आदेशांच्या अधिन राहुन **पुणे पोलीस आयुक्तालयाच्या कार्यक्षेत्रातील सर्व संबंधित नागरिकांनी मास्कचा वापर करणे अनिवार्य राहिल.** तसेच असे मास्क मानांकित प्रतिचे अथवा घरगुती पध्दतीने तयार केलेले व योग्य पध्दतीने स्वच्छ व निर्जंतुक करुन पुन्हा वापरता येण्याजोगे असणे आवश्यक राहिल.

वरील नमुद निर्देशाचे उल्लंघन करणारी व्यक्ती भारतीय दंड विधान संहिता कलम १८८, साथरोग अधिनियम १८९७ मधील तरतुदी व प्रचलित कायदयान्वये शिक्षेस पात्र राहील.

सदरचे निर्देश हे माझ्या सही शिक्यानिशी आज दिनांक ०८/०४/२०२० रोजी दिलेला आहे.

**(डॉ. रवींद्र शिसवे)**
**पोलीस सह आयुक्त**
**पुणे शहर**

**ठिकाण :- पुणे शहर**
**दिनांक :- ०८/०४/२०२०**